पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. ३५ दिनांक १२/०५/२०२६

पालघर पोलीस दलातर्फे अपघातग्रस्तांना तात्काळ मदत मिळण्यासाठी "GOOD SAMARITAN" या ॲपविषयी कार्यशाळेचे आयोजन

दिनांक १२/०५/२०२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर येथे श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/अनिल व्हटकर, प्रभारी अधिकारी, जिल्हा वाहतूक शाखा, पालघर यांचेमार्फत **"GOOD SAMARITAN"** ॲपची माहिती तसेच आपत्कालीन परिस्थितीत प्रथमोपचाराबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेस Maharashtra Emergency Medical Services (MEMS) या कंपनीकडील डॉ. मंगेश चव्हाण, डॉ. लक्ष्मण जाधव, डॉ. अमित वाडे, डॉ. नवीन गिरी व डॉ. मनरक हे उपस्थित होते. त्यांनी पालघर जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना अपघातग्रस्तांना तात्काळ प्रथमोपचार कसा द्यावा, तसेच त्वरित रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून वैद्यकीय उपचार कसे मिळवून द्यावेत याबाबत तसेच अपघातानंतरचा प्रथम प्रतिसाद, मूलभूत जिवन रक्षा पद्धती, तात्काळ रुग्णवाहिका सेवा उपलब्धता तसेच **"GOOD SAMARITAN"** ॲपबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी सर्व उपस्थितांनी **"GOOD SAMARITAN"** ॲप डाउनलोड करून कर्तव्यावर असताना त्याचा प्रभावी वापर कसा करावा याबाबत माहिती घेतली. सदर कार्यशाळेस पोलीस अधीक्षक कार्यालयातील १०८ पोलीस अधिकारी व अंमलदार, रस्ता अपघात नियंत्रण समिती सदस्य, MEMS टीम व जिल्ह्यातील पत्रकार बांधव उपस्थिती होते.

सदर ॲपची कार्यपद्धती व वापराबाबतची माहिती वाहतूक शाखेमार्फत जिल्ह्यातील ठिकाणी लावण्यात आलेल्या एलईडी स्क्रीनवर प्रसारित करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्येही या ॲपविषयी जनजागृती होवून अपघातग्रस्तांना तात्काळ प्रथमोपचार व वैद्यकीय मदत उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. परिणामी, रस्ते अपघातातील जखमींचे प्राण वाचविण्यास या उपक्रमाचा मोलाचा फायदा होणार आहे.